सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

रासेयो/२०२५–२६/३७ दि. २७/०५/२०२५

**प्रति,**

**मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये**

**मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था**

**मा. विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**विषय : सन २०२५–२६ करिता राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नव्याने स्वयंनिर्वाही एकक सुरू करण्याबाबत**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील संलग्नीत महाविद्यालयांमार्फत राष्ट्रीय सेवा योजना अतिशय प्रभावीपणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून राबविली जाते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर दोन वर्षात त्यांचा सर्वांगीण विकास होऊन विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होण्यास मदत होते. सदर विद्यार्थी भविष्यकाळात यशस्वी नागरीक म्हणून गौरविले जातात.

नॅकद्वारे ज्या महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले आहे त्यात जवळपास सर्वच निकषांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेने अतिशय महत्वाचे योगदान दिले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सामाजिक अभियांत्रिकीमुळे महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेला आणि प्रत्यक्ष मूल्यांकनाला एक वेगळी झळाळी आणि गौरव प्राप्त झाला आहे, ही अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या महाविद्यालयात/संस्थेत/विभागात सन २०२५–२६ या शैक्षणीक वर्षाकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे नव्याने स्वयंनिर्वाही एकक स्थापन करावयाचे असल्यास दि. १५ जुलै, २०२५ पर्यंत आपल्यामार्फत स्वयंनिर्वाही एककाकरिता खालील कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, याठिकाणी पाठविण्यात यावा.

१. महाविद्यालयाच्या/संस्थेच्या/विभागाच्या लेटरहेडवर रासेयो स्वयंनिर्वाही एकक मागणी पत्र
२. रु. १०० स्टँप पेपरवर हमीपत्र (सोबत नमुना जोडला आहे)
३. राष्ट्रीय सेवा योजना एकक मागणी प्रस्ताव (सोबत नमुना जोडला आहे)
४. महाविद्यालयाचे शासन व विद्यापीठ मान्यतापत्र (छायांकित प्रत)
५. मा. प्राचार्य/मा.संचालक/मा.विभागप्रमुख यांचे नेमणूक आणि विद्यापीठ मान्यतापत्र (छायांकित प्रत)
६. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी नेमणूक आणि विद्यापीठ मान्यतापत्र.

*सोबत : वरीलप्रमाणे*

*※ अ.क्र. १ ते ६ पैकी एका बाबीची अपूर्ण असल्यास प्रस्ताव अमान्य होईल याची कृपया नोंद घ्यावी.*

***महाविद्यालयांना स्वयंनिर्वाही एकक मंजूर करण्यचे निकष :***

1. ***महाविद्यालयाची स्थापना मागील ३ वर्षांपासून असावी.***
2. ***महाविद्यालयाची एकूण विद्यार्थी संख्या किमान २०० असणे आवश्यक आहे.***
3. ***मा. प्राचार्य व नेमणुक केलेले कार्यक्रम अधिकारी यांची विद्यापीठ मान्यता अनिवार्य आहे.***

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

***टिप : १. उपलब्धततेनुसार रासेयो स्वयंनिर्वाही एकक मंजूर करण्यात येईल.***
***२. ज्या महाविद्यालयांना यापूर्वी रासेयो एकक मंजूर करण्यात आले आहे अशा महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर करू नये.***
***३. वरील सर्व बाबींची पूर्तता असल्यासच प्रस्ताव सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव असल्यास विचार केला जाणार नाही.***

| रु. १००/- स्टॅम्प पेपर |
|---|

**हमीपत्र**

दिः ...............

**प्रति,**
**मा. संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,**
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७.**

**विषय- राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककाबाबत...**

मा. महोदय,

आमचे, .......................................... महाविद्यालय हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्रीत आहे. आमच्या महाविद्यालयाचा विद्यापीठ मान्यतापत्र क्र. ................. (दिनांक / / ) आहे. आमचे महाविद्यालय शैक्षणिक वर्षे ................. पासून सुरु असून महाविद्यालयामध्ये ........................................ या शाखा आहेत. महाविद्यालयातील मागील वर्षाची (सन २० - ) विद्यार्थी संख्या .................. होती.

१. आमच्या महाविद्यालयामध्ये मान्यताप्राप्त प्राचार्य आहेत. (त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे.)
२. राष्ट्रीय सेवा योजनेकरीता कार्यक्रम अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या प्राध्यापकास विद्यापीठाची शिक्षक मान्यता आहे.
३. आपले राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक सुरु करण्याची आमची इच्छा असून आम्ही अत्यंत चांगले उपक्रम राबविणार आहोत. याची सर्व जबाबदारी संस्थाचालक/प्राचार्य म्हणून आमची राहील याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे.

या हमीपत्राद्वारे आम्ही आपणास अशी हमी देतो की, विद्यापीठाच्या किंवा राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रतिमेस कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नियमित कार्यक्रम (विद्यापीठाने दिलेल्या निर्देशांप्रमाणे आमचेकडून त्याची वेळोवेळी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.) तसेच हिवाळी शिबीर अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडू व याकरीता विद्यापीठाकडून मंजुर करण्यात आलेली विद्यार्थी संख्या परीपुर्ण करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील. मंजुर विद्यार्थी संख्येव्यतिरीक्त जास्त विद्यार्थी या योजने अंतर्गत नोंदवून घेतल्यास याची सर्वस्वी (अनुदान, अतिरीक्त गुणांचा लाभ, प्रमाणपत्र इ.) जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

रासेयो विभागामार्फत मिळणाऱ्या अनुदानाचे लेखे व अहवाल विद्यापीठाने निर्दिष्ट केलेल्या वेळेमध्ये सादर करण्यात येतील अशी आम्ही हमी देतो. आपण दिलेल्या वेळेत राबविलेल्या उपक्रमांचे अहवाल, मिळालेल्या अनुदानाचे लेखे सादर न केल्यास राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयामार्फत घेण्यात येणारा निर्णय आम्हांला मान्य असेल.

**मा. प्राचार्य** **मा. संस्थापक अध्यक्ष/सचिव**

| पनकोड/Puncode |
|---|
| |

# सन २०२५–२६ रासेयो स्वयंनिर्वाह एककासाठी महाविद्यालयाची माहिती व प्रस्ताव

१. महाविद्यालयाचे नाव : ______________________

२. प्राचार्याचे नाव व मोबाईल नंबर : ______________________

३. नेमणूक कायमस्वरूपी /प्रभारी : ______________________

४. महाविद्यालयाचा विद्यापीठ संलग्नीकरण क्रमांक : ______________________

५. महाविद्यालयास शासन मान्यता आहे काय? ______________________

असल्यास १) मान्यता क्र. : ______________________

२) अनुदानित अथवा विनाअनुदानित : ______________________

६. प्रशिक्षित / अप्रशिक्षित कार्यक्रम अधिकारी नावे व अनुभव :

अ) ५०—१०० एककास एक कार्यक्रम अधिकारी
ब) १५०—२०० दोन कार्यक्रम अधिकारी
क) २५०—३०० तीन कार्यक्रम अधिकारी

| अ.क्र. | कार्यक्रम अधिकारी व विषय | जन्म दिनांक | शिकविण्याचा अनुभव | विद्यापीठ मान्यता आहे/नाही | प्रशिक्षित /अप्रशिक्षित (रासेयो अहमदनगर येथे) | कार्यक्रम अधिकारी म्हणून अनुभव | कार्यक्रम अधिकारी फोन निवास मोबाईल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

७. मागील तीन वर्षाची महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या :

| वर्ष | महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या | | | रासेयो स्वंयसेवक संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| .............. | | | | | | |
| .............. | | | | | | |
| .............. | | | | | | |

८. सन २०.... —२०.... साठी रासेयो अपेक्षित स्वंयसेवक संख्या ............................

(संख्या वाढवून किंवा कमी करून हवी असल्यास स्वतंत्र पत्र देणे अपेक्षित आहे.)

प्राचार्य

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना